
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता

संपादक

डॉ. संभाजी पाटील



भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता : शतकपूर्तीनिमित्त
भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई
यांच्या अनुदानातून होत असलेल्या मराठी विषयाच्या राष्ट्रीय चर्चासत्रातील
शोधनिबंधांचा संपादित ग्रंथ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता


: मार्गदर्शक :

**प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे**

: संपादक :

**डॉ. संभाजी पाटील**

: संपादक मंडळ :

डॉ. गोविंद उफाडे
प्रा. बापूसाहेब जवळेकर
डॉ. शिवराज काचे
डॉ. विजयकुमार करजकर
मराठी विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर



अरुणा प्रकाशन, लातूर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता (संपादित)**
**Dr. Babasaheb Aambedkar Yanchi Patrakarita (Ed.)**
**संपादक :**
डॉ. संभाजी पाटील
**संपादक मंडळ :**
डॉ. गोविंद उफाडे, प्रा. बापूसाहेब जवळेकर
डॉ. शिवराज काचे, डॉ. विजयकुमार करजकर

ISBN 978-93-5240-198-7

अरुणा प्रकाशन
१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४ ८६९३५, ९४२१३ ७१७५७

© सर्व हक्क - प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

प्रथम आवृत्ती : ३१ मार्च २०२२

मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्युटर, लातूर

मूल्य : ५००.०० रुपये

*'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता' या ग्रंथातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी कॉलेज प्रशासन, संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित,

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

व

## राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने

आणि

**भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई, प्रायोजित**

**भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता :**

**शतकपूर्तीनिमित्त मराठी विषयाचे दोन दिवसीय**

## राष्ट्रीय चर्चासत्र

**विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता: शोध आणि बोध**

**दिनांक : ३० व ३१ मार्च २०२२**

---

भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई, यांच्या अनुदानातून दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न होत आहे.

या राष्ट्रीय चर्चासत्रात सादर झालेल्या ५३ शोधनिबंधाचा

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता**

हा संपादित ग्रंथ प्रकाशित होत आहे.

**सदरील ग्रंथासाठी भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई, यांच्याकडून अनुदान प्राप्त झाले आहे.**

---

**: आयोजक :**

**डॉ. महादेव गव्हाणे**

प्राचार्य

| डॉ.संभाजी पाटील | डॉ.ओमप्रकाश शहापूरकर | डॉ. अभिजीत यादव | प्रा.सदाशिव शिंदे |
|---|---|---|---|
| चर्चासत्र समन्वयक | परीक्षा नियंत्रक | समन्वयक, अं.गु.ह.कक्ष | उप-प्राचार्य |

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

मध्यवर्ती बसस्थानकासमोर, चंद्रनगर, लातूर- ४१३५१२, फोन नं.-०२३८२ २४५९३३

१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता - एक मानवतावादी दृष्टिकोन
डॉ. वनमाला लोंढे ........ १८२
१३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नियतकालिकातील कथा
बाबासाहेब भा. खंडाळे, डॉ. यशवंत सोनुने ........ १८८
१४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रीय लेखनशैली
प्राचार्य डॉ. हरिश्चंद्र निर्मळे ........ १९३
१५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक'ची प्रासंगिकता
डॉ. गोविंद उफाडे ........ २०७
१६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूकनायकातील सामाजिक न्यायाची संकल्पना
प्रा. बापूसाहेब जवळेकर, डॉ. संभाजी पाटील ........ २१७
१७. 'मूकनायक' वृत्तपत्रातील समाजचिंतन
डॉ. शिवराज काचे ........ २३२
१८. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार
डॉ. शंकर कल्याणे ........ २३९
१९. निर्भीड पत्रकार डॉ. भीमराव आंबेडकर
डॉ. जे. टी. कांबळे ........ २४६
२०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृतपत्रिकेतील स्त्री
मनिषा लातूरकर ........ २५३
२१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता : मूल्यशोध
डॉ. जयद्रथ जाधव ........ २६१
२२. पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रीय भाषाशैली
डॉ. अशोक नारनवरे ........ २६४
२३. मानवतावादी पत्रकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर
शिवाजी मोतीबोणे ........ २७७
२४. 'जनता' मधील डॉ. आंबेडकरांची हिंदू धर्मचिकित्सा
डॉ. अनिल कांबळे ........ २८६
२५. 'मूकनायक' मधील अग्रलेख चिकित्सा
प्रा. हर्षवर्धन कोल्हापूरे ........ २९०

# १७

# 'मूकनायक' वृत्तपत्रातील समाजचिंतन

००० 

डॉ. शिवराज काचे, लातूर

**प्रस्तावना**

आजच्या वर्तमानात वर्तमानपत्रातील बातमी ही संध्याकाळपर्यंत शिळी होवून जाते. म्हणजेच सध्याच्या वर्तमानपत्रातील लिखाण हे तात्कालीक स्वरूपाचे दिसून येते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या वृत्तपत्रातून तसेच अन्यत्र केलेले लिखाण हे त्यांच्या अनुभवाचे खडे बोल असल्याचे दिसून येते. तसेच अंतकरणाची धगधग वा आच असल्याने त्यांच्या प्रत्येक क्षेत्रातील लिखानास शाश्वत मूल्ये लाभले आहे. विशेषतः सुवर्णाची झळाळी प्राप्त झाली आहे. ते लिखाण केवळ महाराष्ट्राच्या वा भारतीयांच्याच नव्हे तर जागतिक वाङ्‌मयात, दीन-दलितांच्या प्रश्नांवरचा जगाला उपयोग पडणारा, मार्गदर्शन करणारा वाङ्‌मयीन ठेवा आहे. जगाच्या पाठीवर पाहिले तर अमेरिकेतील 'निग्रो'चा लढा, जर्मनीतील 'ज्यू'चा लढा या सर्वापेक्षा अस्पृश्यता लढ्याची धार वेगळी आहे. मानवी जीवनात अस्पृश्य म्हणून जन्माला आलेल्यांना सर्व दृष्टीने दूर ठेवले गेले, त्यांची विविध पातळीवर नागवणूक केली. असे जगाच्या पाठीवर कुठेच दिसत नाही. वृत्तपत्राच्या बाबतीत ध्येयवादीपणे वृत्तपत्र चालवणे आणि पोटभरण्याचा धंदा म्हणून वृत्तपत्र चालविणे या दोन टोकाच्या बाबी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निबिड अंधःकारात उडी घेवून आपल्या पत्रकारितेच्या व इतर लिखाणाच्या जोरावर आपल्या समाजबांधवाच्या टाहोला जगाच्या वेशीवर टांगले आहे.

महाराष्ट्रातील वृत्तपत्रसृष्टीकडे पाहिले तर जनक्षोभनिर्मिती बरोबरच जनसंवाद निर्मितीचे कार्यही केले आहे. एवढेच नाही तर वृत्तपत्रे ही स्फोटासारखी असतात. जनमताला सुरुंग लावण्याचे काम ते करत असतात. याचे भान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होते. त्यांनी आपल्या सामाजिक वा राजकीय कार्याला सुरूवात करताना साहजिकच त्यांना वृत्तपत्राची आवश्यकता भासली. आपल्या अज्ञ बांधवांना तसेच आपल्या वैचारिक विरोधकांना जाणीव करून देण्याकरिता तसेच वेळोवेळच्या



प्रश्नांना उत्तरे देण्याच्या दृष्टीने ३१ जानेवारी १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक' ह्या आपल्या पहिल्या पत्राला जन्म दिला आणि दलित पत्रकारितेला आंबेडकर युगाचा परिस्पर्श झाला. 'मूकनायकात' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकूण चौदा लेख लिहिले. पाक्षिक म्हणून सुरू झालेला 'मूकनायक' अंक दर शनिवारी प्रकाशित होत असे.

'मूकनायक' च्या पहिल्या अंकाच्या 'मनोगत' अग्रलेखात म्हटले आहे की, हिंदू धर्मियात आलेली ही विषमता जितकी अनुपम आहे. तितकीच ती निंदास्पदही आहे. कारण विषमतेनुरुप होणाऱ्या व्यवहारांचे स्वरुप हिंदू धर्माच्या शिलाला शोभण्यासारखे खास नाही. हिंदू धर्मात होणाऱ्या जाती उच्चनीच भावनेने प्रेरीत झालेल्या आहेत हे उघड आहे. हिंदू धर्मात जाती विषमतेला अनुरुप म्हणतांना तितकीच ती निंदास्पद ही आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. निंदास्पद म्हणण्याचे मुख्य कारण म्हणजे एकीकडे सर्वाठायी परमेश्वर आहे, म्हणजेच 'जळी स्थळी काष्ठे पाशाणी' दगड धोंड्यातही परमेश्वर आहे असे म्हणावयाचे परंतू दूसरीकडे त्याच हिंदू धर्मात- हिंदू समाजात चातूर्वर्ण्यातून निर्माण झालेल्या जातीमुळे उच्चनीचतेची उतरंड निर्माण करून, त्यातही शुद्र जातीवर तसेच शुद्रातिशुद्र अस्पृश्य जातीवर जगाच्या पाठीवर कुठेही नसेल असा अन्याय, जुलूम, पिळवणूक इत्यादी थोपून त्यांना पशुपेक्षाही वाईट जिणं जगावयास भाग पाडले आहे. म्हणून ह्या जाती विषमतेला त्यांनी निंदास्पद म्हटले आहे.

**रोटीबेटी व्यवहाराअभावी कायम परकेपण**

हिंदू समाज हा एक मनोरा आहे. म्हणजेच येथे जातीची खूप मोठी उतरंड आहे. ज्या उतरंडीत ज्याने जन्मावे त्याच उतरंडीत मरावे. याविषयी मत व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "उच्च जातीत जन्मलेला मग तो कितीही अवगुणी असो तो उच्च म्हणावयाचा. तसेच नीच जातीत जन्मलेला मग तो कितीही गुणी असो, नीचच राहावयाचा. दुसरे असे की, परस्परात रोटीबेटी व्यवहार होत नसल्यामुळे दर एक जात या जिव्हाळ्याच्या संबंधात स्वयंवह म्हणजे तुटक आहे. काहींचा व्यवहार दारापर्यंत होतो. कांही जाती तर अस्पृश्य आहेत. त्या जातीतील माणसांचा स्पर्श झाला असता, इतर जातीतील माणसास 'विटाळ' होतो व विटाळामुळे या बहिष्कृत जातीशी इतर जातीच्या लोकांचा क्वचितच व्यवहार होतो. रोटीबेटी व्यवहाराअभावी कायम परकेपणात स्पृश्यास्पृश्य भावनेने इतकी भर टाकली आहे की, या जाती हिंदू समाजात असून समाजाबाहेर आहेत असेच म्हटले पाहिजे."

समाजातील रोटीबेटी व्यवहार बंद झाल्याने प्रत्येक जात[illegible]का विशिष्ट कुंपनात राहते आहे. त्यातच अस्पृश्य समाजाच्या व्यक्तिला स्पर्श झाला तर 'विटाळ' ही अंगावर शहारे आणणारी रूढी ही मानवतेला खऱ्या अर्थाने कलंक आहे. रोटीबेटी व्यवहाराअभावी इतका अतिरेक झाला की, अस्पृश्य समाज हिंदू धर्मात असूनही समाजाबाहेर पडला आहे. एवढेच नाही तर अस्पृश्यतेमुळे त्यांना पशुवत वागणूक दिल्याने त्यांच्यातील कार्यक्षमता, स्वाभिमान या गोष्टींना कायमची मूठमाती मिळाल्याने त्यांचे जगणे हे मरणप्राय ठरले आहे. ही बाब समाजाच्या व राष्ट्राच्या दृष्टिने घातक आहे. एवढा मोठा अघात अस्पृश्य समाजावर होणे म्हणजे समाजाला, राष्ट्राला गर्तेत लोटून दिल्यासारखे आहे.

**भूदेवांची धर्मशास्त्राला अशास्त्रीय कलाटणी**

चातुर्वर्ण्य व्यवस्था व जातीव्यवस्थेमुळे हिंदू धर्मिय ब्राम्हण, ब्राम्हणेत्तर व बहिष्कृत असे तीन वर्ग निर्माण झाले. यामुळे समाजात विषमता निर्माण झाली. या व्यवस्थेला ब्राह्मणांनीच खतपाणी घातले. ही विषमता त्यांना अधिक लाभदायक ठरली. ते स्वतःला भूदेव समजू लागले. या चतूर ब्राह्मणांनी धर्मशास्त्रांनाही वेळोवेळी अशास्त्रीय कलाटणी देत राहिल्याने सर्वच समाजाकडून ते बिनदिक्कतपणे सेवा स्वीकारु लागले. तसे न केले तर ते अधर्म ठरवू लागले. यासाठी ब्राह्मणांनी स्वतःच्या स्वार्थासाठी धर्मशास्त्रीय विचार गहाण ठेवला. एकीकडे सर्व सचेतन आणि अचेतनं वस्तू ईश्वराची रुपे आहेत. सर्व चराचरात ईश्वर आहे. अशी उदात्त विचारसरणी तर दुसरीकडे पूर्णतः त्याविरूद्ध आचारसरणी हा प्रकार राजरोसपणे चालू होता. जातीच्या मायाजाळात सारा समाजच असा कांही गुतवून टाकला गेला की वाटेल तसा जुलूम, पिळवणूक होऊनही हे आपले पूर्वजन्मीचे पाप म्हणून अस्पृश्य समाज मूक होवून सहन करीत होता. आपण हिंदू धर्माचे पालन करीत आहोत अशा खोट्या,भाबड्या फसवेगीरीच्या जाळ्यात अस्पृश्य समाज अडकून पडला.

**सत्ता व ज्ञानाअभावी बहिष्कृत पूर्ण नागवला गेला**

चातूर्वर्ण्य व्यवस्थेमुळे अस्पृश्य समाज मुख्य प्रवाहापासून दूर लोटला गेला. अस्पृश्यांच्या स्पर्शाने 'विटाळ' होवू लागला. यामुळे त्या काळातील ज्ञानमंदिरे त्यांच्यासाठी बंद झाली. याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "सत्ता व ज्ञान नसल्यामुळे ब्राह्मणेत्तर मागासले. त्यांची उन्नती खुंटली हे निर्विवाद आहे. परंतू त्यांच्या दुःखात दारिद्र्याची तरी भर पडली नाही. कारण शेती, व्यापार उदिम अथवा नोकरी करुन आपला चरितार्थ चालविणे त्यांना दुरापास्त नाही. पण या सामाजिक



विषमतेचा ब[illegible]त समाजावर झालेला परिणाम अतिशय घोर आहे. दौर्बल्य, दारिद्र्य व अज्ञान या त्रिवेणी संगमात हा अफाट बहिष्कृत समाज वाहवला असला पाहिजे हे खास."

चातूर्वर्ण्यव्यवस्था निर्माण करुन ब्राह्मणांनी स्वहित जोपासण्याचे षड्यंत्र निर्माण केले. यात सर्वात जास्त नुकसान झाले ते ब्राम्हणेत्तर व बहिष्कृत समाजाचे. ब्राम्हणेत्तरांची प्रगती खुंटली पण त्यांच्यावर झालेल्या अन्यायामुळे, त्यांच्या दुःखात किमान दारिद्र्याची भर पडली नाही. कारण त्यांना शेती, व्यापार, उदीम, नोकरी या बाबी करण्यास मोकळीक होती. पण अस्पृश्यावर जी आपत्ती कोसळली ती त्यांना दारिद्र्याच्या खड्ड्यात घेवून जाणारी होती. त्यातच अस्पृश्यांचे ज्ञान, व्यापार, उदीम, नोकरी हे सर्व हक्क हिसकावून घेतले गेले. त्यामुळे त्यांच्या वाट्याला दारिद्र्य आले. शिक्षणाच्या हक्कापासून त्यांना वंचित ठेवल्यामुळे ते शक्तीहीन तर झालेच पण त्याचबरोबर अपार दारिद्र्यही त्यांच्या पाचवीला पूजले गेले. असा हा सर्वच बाजूंनी नागवलेला बहिष्कृत समाज ब्राह्मण व ब्राह्मणेत्तरांच्या दावणीला गच्च बांधला गेला. निसर्गाने इतर प्राण्यापेक्षा मानवाला बुद्धी दिली असली तरी त्याला जनावरापेक्षाही खालच्या पातळीचं जिणं जगण्यास भाग पाडले. माणूस म्हणून जगण्याचा हक्क देखिल या व्यवस्थेने हिरावून घेतला गेला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पहिल्याच वृत्तपत्राचे नाव 'मूकनायक' ठेवले आहे. त्या नावातही विशेष अर्थगर्भता आहे. त्यांचा बहिष्कृत समाज हा मूक बनला होता, नाही तर बनविला गेला होता. त्याचे नायकत्व करण्याचे त्यांनी मनाशी ठाम केल्यामुळे त्या पत्रास त्यांनी 'मूकनायक' हे अर्थपूर्ण नाव दिले होते. आपला नायक बहिष्कृत समाज हा मूक आहे. याला बोलते करायचे आहे असाही उद्देश असावा. 'मूकनायक'वर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव नसले तरी त्यांनी सुरू केलेल्या चळवळीचे ते मुखपत्र होते. त्यावेळी ते सिडनेहॅम महाविद्यायात नोकरी करीत असल्याने संपादक म्हणून पांडुरंग दत्ताराम भटकर या सुविद्य तरुणाचे नाव दिले होते. 'मूकनायक' चे एकूण बारा अंक प्रकाशित झाले. त्यातील उपलब्ध अंकातून आलेला विचार खूप महत्त्वाचा आहे.

**दि. ३१.०१.१९२० प्रथम अंक : 'मनोगत'**

"हिंदूधर्मात समाविष्ट होणाऱ्या जाती उच्च-नीच भावनेने प्रेरीत झालेल्या आहेत, सत्ता व ज्ञान नसल्यामुळे ब्राह्मणेत्तर मागासले, त्यांची उन्नती खुंटली. सचेतन व अचेतन वस्तू ही ईश्वराची रूपे आहेत. राजकीय सत्ता मिळून तिच्या जोरावर

सामाजिक विषमतेचे दडपण कायम करू पहाणाऱ्यांचा का... बहिष्कृत समाजाने ओळखला आहे." पहिल्या अंकाच्या मनोगतातच ब्राह्मणेतर वर्ग कसा नागवला गेला आहे. त्यांची प्रगती पूर्णतः खुंटली आहे. हिंदू समाजात जातीची एक उतरंड आहे. यात प्रत्येक जात कोणत्यातरी जातीच्या वर आहे. या विचाराने पछाडलेली आहे. हिंदू एकीकडे सचेतन व अचेतन ही सारे ईश्वराची लेकरे मानायची तर दुसरीकडे अस्पृश्यांच्या नावाखाली पायदळी तुडवायचे. हा हीन प्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नजरेस आणून दिला. तसेच राजकीय सत्ता मिळवून हीच विषमता तशीच ठेवून ब्राह्मणांची मिरासदारी चालू ठेवण्याचा कावा करायचा, पण तो कावा आता ब्राह्मणेत्तर अस्पृश्य चालू देणार नाहीत. हा दृढनिश्चय करताना दिसतात.

**दि. १४.०२.१९२० दुसरा अंक 'स्वराज्याची सर सुराज्याला नाही'**

इंग्रजांच्या अंमलातून भारतीय समाज बाहेर पडू इच्छित आहे. पारतंत्र्यातून स्वराज्यात येवू इच्छित आहे. पण स्वराज्यात सर्व सत्ता ब्राम्हणांच्या हाती राहिली तर तिचा उपयोग नाही, खऱ्या अर्थाने स्वतंत्र्य नाही. याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "स्वातंत्र्य नष्ट झाले असता. शांतता राहते पण व्यक्तिविकास होत नाही... इंग्रजी विद्येच्या प्रभावाने त्यांना राजा आणि प्रजा यांचे हक्क कळू लागले आहेत... ब्रिटीश सुराज्य करण्याकडे लक्ष देत आहेत. पण काँग्रेसची मागणी स्वराज्याची आहे. तत्वतः हे खरे असले तरी व्यवहार म्हणून स्वराज्य आले तरी ते कोणाचे आले व कशासाठी हा महत्त्वाचा भाग आहे. स्वराज्य येऊन जर ते ब्राम्हणांच्याच हाती राहणार असेल तर त्याला अर्थ नाही. इतरांवर ते जुलमांचेच राहणार." स्वराज्य आणि सुराज्यात फार मोठी तफावत असते. स्वराज्य असून जर ब्राम्हणाचे वर्चस्व असेल तर जातीभेद जाणार नाही. हे जोपर्यंत समजणार नाही तोपर्यंत स्वराज्याचा उपयोग नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर निक्षून सांगतात.

**दि. १८.०२.१९२० तिसरा अंक 'हे स्वराज्य नाही, तर आमच्यावरती राज्य'**

"स्वराज्याच्या मागणीच्या मुळाशी हेतू कोणता ही गोष्ट महत्त्वाची होय. स्वराज्य देणगी साधक की बाधक, सहा कोटी बहिष्कृतांचा विकास होण्याच्या दृष्टीने काय केले? स्वराज्यामुळे व्यक्तिविकास होणार नसेल, तर सहा कोटी अस्पृश्यांची स्थिती तशीच राहणार असेल, तर अशा स्वराज्याचा कांही उपयोग तर नाहीच पण उलट ते अस्पृश्यांवरती दोन तीन हजार वर्षे होणाऱ्या अन्यायाची तशीच गत पुढे राहणार म्हणजे अस्पृश्यांना कोणतेही स्वातंत्र्य नाही. ही गळचेपी पुढेही चालू राहणार. म्हणजे अस्पृश्य समाज जो भोगत आला आहे. तेच भोग पुढेही चालू राहणार .



**दि. २७.०३.१९२... ...चवा अंक 'स्वराज्यातील आमचे आरोहण'**

पारतंत्र्यातून स्वराज्यात प्रवेश करत असताना मागास वर्गाचा विकास झाला पाहिजे. त्यासाठी मागास समाजाच्या संख्येनुसार त्यांना प्रतिनिधी मिळाले पाहिजेत याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "जाती संख्येच्या व गरजेच्या प्रमाणात प्रतिनिधी मिळाले पाहिजेत म्हणून बहिष्कृत वर्गास जास्त प्रतिनिधी देणे जरूर आहे. कायदे कौन्सिल व वरिष्ठ कायदे कौन्सिल दोन्हीकडे जागा दिल्या पाहिजेत." मागास वर्गास संख्येच्या मानाने अधिक जागा मिळाव्यात, अधिक सवलती मिळाव्यात म्हणजेच अर्थिक, सामाजिक बाबतीत वर उचलून घेतले पाहिजे. परंतु स्वराज्याच्या नावावर मागील प्रमाणेच इतरांवर राज्य कराव याचे असेल तर मागास वर्ग ते मान्य करणार नाही, असे दिसून येते.

**दि. १०.०४.१९२० सहावा अंक 'राष्ट्रातील पक्ष'**

ब्रिटीशांपूर्वी भारतीय समाज एकत्र येणे शक्य नव्हता. कारण भारतात अनेक जाती, धर्म आणि भाषा यामुळे विखुरलेला होता. ब्रिटीशानंतर इंग्रजी भाषेमुळे समाजात परिवर्तन झाले. स्वराज्याच्या मागणीसाठी वेगवेगळ्या विचारप्रणाली निर्माण होवू लागल्या. याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "ब्रिटीशांपूर्वी अनेक धर्म, अनेक जाती, अनेक भाषा इत्यादीमुळे प्रजा एकजीव होणे शक्य नव्हती. हिंदी प्रजा एकवट होण्यास एकछत्री अमल जितक्या परिने कारणीभूत झाला. निर्भळ स्वराज्य मागणारा जहाल कंपू तर साम्राज्यांतर्गत स्वराज्य मागणारा मवाळ पक्ष स्वराज्य प्राप्तीस आपण लायक आहोत असे सिद्ध केले पाहिजे." ब्रिटीशांमुळे एकछत्री भारत निर्माण झाला. इंग्रजी भाषा ही त्यास कारणीभूत ठरली. पण आता आपण स्वराज्याकरिता लायक आहोत हे सिद्ध करणे गरजेचे आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटते.

**दि.०५.०६.१९२० दहावा अंक 'अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद, नागपुर'**

या परिषदेला संबोधित करताना खूप महत्त्वाचे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले. ते म्हणजे रोटीबेटी व्यवहार झाले पाहिजेत, अस्पृश्य वर्गास सर्व व्यवसाय खुले केले पाहिजेत, लोकसंख्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे, मुलामुलींना मोफत शिक्षण मिळाले पाहिजे. अशा विचारांची मांडणी त्यांनी केली. हाच विचार मूकनायक मधून प्रकाशित करण्यात आला.

सारांश

'मूकनायक'ने अस्पृश्यांच्या आकांक्षा रूजविण्याचा जो पहिला प्र... केला त्याला ऐतिहासिक असे महत्त्व निर्माण झाले. अस्पृश्य समाजात एकात्... अस्मिता जागी झाली. समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करू लागला. म... म्हणून जगण्याचा प्रयत्न करू लागला. 'मूकनायक'ने अल्पावधीत केलेले... लोकजिवन घडवणारे होते. प्रबोधनाचा तो अविष्कार होता.

**निष्कर्ष**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजबांधवाचे दुःख जगा... ठेवण्याचा प्रयत्न केला.

२. हिंदू धर्मातील जातीयता वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला.

३. ब्राह्मणांनी स्वतःच्या स्वार्थासाठी धर्मशास्त्रीय विचार गहाण ठेवून क... स्वार्थ साध्य करण्याचा प्रयत्न केल्याचे चित्र दिसून येते.

४. अस्पृश्यांना त्या काळातील ज्ञानमंदिरे बंद केली होती ही बाब समाजहि... दृष्टीने घातक असल्याचे दिसून येते.

५. मागासवर्गांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर... केल्याचे दिसून येते.

**संदर्भग्रंथ**


१. 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर', गंगाधर पानतावणे, प्रतिमा प्रकाशन, ... औदुंबर अपार्टमेंटस्, सदाशिव पेठ, नवा विष्णू मंदिर चौक, पुणे- ४११०३०, द्वितीयावृ... - १९९६.

२. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता:एक समाजशास्त्रीय विश्लेषण', डॉ. ... खंडाळे-इंगोले, स्वरुप प्रकाशन, 'अक्षर' ८५८, सह्याद्री नगर, एन-५, सिडको, औरंगाबाद-४३१००३, प्रथमावृत्ती ०२ मार्च २००७.

३. 'अग्रलेख मूकनायक आणि बहिष्कृत भारत', प्रदीप गायकवाड, क्षितीज पब्लिकेशन, नागपूर -१७, सहावी आवृत्ती १९ मार्च २०१२.




**डॉ. शिवराज का...**

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

भ्रमणध्वनी - ८३२९३१८०११


०००





"आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग याच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमान पत्रासारखी अन्य भूमीच नाही..."

"समाज ही एक नौकाच आहे. व ज्याप्रमाणे आगबोटीत बसून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा त्यांची त्रेधा कशी उडते ही गम्मत पाहण्यासाठी म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा, जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधि ही घ्यावीच लागणार आहे. त्याच प्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार, यात बिलकूल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करण्याचे पढतमूर्खांचे लक्षण शिकू नये. हा बुद्धिवाद ज्यांना कबूल आहे अशी वर्तमानपत्रे निघाली आहेत हे सुदैवच म्हणावयाचे..."

**- डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

('मूकनायक' व 'बहिष्कृत भारत'च्या पहिल्या अग्रलेखातून)




**अरुणा प्रकाशन, लातूर**
१०३, ओंकार कॉम्पलेक्स-अ, खर्डेकर स्टॉप,
औसा रोड, लातूर मो. ९४२१४८६९३५

ISBN 978-93-5240-198-7
9 789352 401987